विद्याविकास

स्वररंग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
|| यः क्रियावान् स पण्डितः ||

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. अभिजीत कुलकर्णी**
**संचालक**

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३८० दिनांक : १०/०६/२०२४

प्रति,
**मा. प्राचार्य,**
विद्या प्रतिष्ठानचे,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
विद्यानगरी बारामती, जि. पुणे

**विषय : विद्यार्थी विकास मंडळ वार्षिक पारितोषिक प्रदान व गौरव समारंभ.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी सन २०२१–२२ मध्ये प्रकाशित केलेल्या नियतकालिकांची स्पर्धा विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आली होती.

आपणास कळविण्यास आनंद होत आहे की, आपल्या महाविद्यालयाच्या **'विद्यादीप'** या नियतकालिकास **अव्यावसायिक विभागातून विद्यापीठस्तरावरील प्रथम क्रमांकाचे** पारितोषिक जाहीर झाले आहे. आपल्या महाविद्यालयाचे विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ **मंगळवार, दि. १८ जून, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** येथे संपन्न होणार आहे.

आपल्याला नियतकालिकासाठी सदर पारितोषिक माननीय कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी व इतर मान्यवर ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

प्रस्तुत कार्यक्रमात उपस्थितीसाठी सन्माननीय प्राचार्य/संचालक यांना विनंती की, आपल्यासह नियतकालिक संपादक मंडळ, विजेते विद्यार्थी, संघ, संघ व्यवस्थापक, विद्यार्थी विकास अधिकारी यांची उपस्थिती सुनिश्चित करावी. वर नमूद केलेल्या दिवशी कार्यक्रमासाठी प्रवास/निवास खर्च या विभागातर्फे अनुज्ञेय होणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ